# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## संदर्भ: दि. १९/०९/२०१६ रोजीच्या परिपत्रकास शुध्दीपत्रक

प्रस्तूत विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त संस्थांमधील शिक्षकांच्या शैक्षणिक वर्षात देय असलेल्या किरकोळ रजेसंदर्भात सुटा संघटने समवेत दि. १४/०९/२०१६ रोजी झालेल्या चर्चेनुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाचे दि. ११/०५/२००९ रोजीच्या नैमित्तिक रजेच्या लाभा संदर्भात शासनाने विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ८(४) अंतर्गत निर्देश देणेकामी पारीत केलेला शासन निर्णय मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. १०/०३/२०१० रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवला असता, त्यावर ठराव पारीत करण्यात येवून सदर ठराव खालीलप्रमाणे आहे.

अ) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकीर्ण २००८/(०८-अ/०८)/विशि-अर्थ, दि. ११ मे, २००९ चे नैमित्तिक रजेचे लाभ संदर्भातील पत्राची नोंद घेण्यात आली.

ब) विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त संस्थांमधील शिक्षकांच्या सेवाशर्ती परिनियम २०० (B) (a) (१) मधील तरतूदीप्रमाणे प्रत्येक शिक्षकास शैक्षणिक वर्षात १५ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील.

तरी याची नोंद घेवून सदरची बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावी. सदरच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाची प्रत प्रस्तूत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

DrMishra
कुलसचिव

संदर्भ: सोविसो/कु.का./ ९४०१

दि. 3 OCT 2016

प्रत:

१. मा. संचालक, सर्व संकुले, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२. मा. अध्यक्ष/ प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

माहितीस्तव: आस्थापना विभाग, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
मा. कुलगुरु कार्यालय